# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२, जिल्हा – रत्नागिरी (महाराष्ट्र)

निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

## कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२०–२०२१

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सन २०२०–२०२१ या शैक्षणिक वर्षाकरिता कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर 'ऑफलाईन पध्दतीने' राबविण्यात येत आहे. विद्यालये, प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वर दि. ०८/०९/२०२० पासून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व शुल्क :**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश अर्ज शुल्क (रुपये) | पात्रता | प्रवेश अर्ज सादर करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | खुला प्रवर्ग: ४००/–<br>आरक्षित प्रवर्ग: २००/– | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण | दिनांक. ०८/०९/२०२०ते दिनांक. २५/०९/२०२० |
| २ | मत्स्य अभियांत्रिकी पदविका (Fisheries Engineering) (इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | | | |
| ३ | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र | १ वर्षे | खुला प्रवर्ग: ५०/–<br>आरक्षित प्रवर्ग: २५/– | इयत्ता ९ वी उत्तीर्ण | दिनांक ०८/०९/२०२० ते दिनांक २५/०९/२०२० |
| आरक्षित प्रवर्ग – अ.जा.,अ.ज., वि.जा.*, भ.ज.*, इ.मा.व.*, वि.मा.प्र.*, एस.ई.बी.सी.*, इ.डब्ल्यू.एस.*, (* उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य ) | | | | | |

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवायची कार्यपध्दती.**

- उमेदवाराने www.dbskkv.org या संकेतस्थळावरील Admission या टॅबवर क्लिक करुन दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० पासून प्रवेश अर्ज डाउनलोड करुन, A4 पेपरवर प्रिंट काढून माहिती पुस्तिकेतील सूचनांचे पालन करुन स्वहस्ताक्षराने पूर्ण भरुन प्रवेश घ्यावयाच्या विद्यालय/केंद्रामध्येच विहित मुदतीत सादर करावा. यानंतर प्रवेश अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- प्रवेश अर्ज भरताना उमेदवाराने पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी व आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे साक्षांकीत/स्वसाक्षांकीत करुन, प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या कृषि तंत्र विद्यालय/मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालय/बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम केंद्रात प्रवेश अर्जासह विहित शुल्क भरुन सादर करावे.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क रोखीने/डीडीने संबंधित विद्यालय/केंद्रात भरावे व पावती घ्यावी. अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात न घेता रद्दबातल ठरविण्यात येतील याची नोंद घ्यावी.
- अधिक तपशीलासाठी निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, या कार्यालयाशी संपर्क साधावा दूरध्वनी क्र. ०२३५८–२८२४११, २८२४१२ विस्तार १२२/१२१
- **माहिती पुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० पासून उपलब्ध आहे**

सही/–

कुलसचिव,

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली, जिल्हा – रत्नागिरी.

ठिकाण : दापोली.

दिनांक : १८/०८/२०२०